लघवीत बुडबुडे आल्यास वेळीच उपचार आवश्यक

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : साधी व स्पष्ट लघवी न होता त्यात बुडबुडे दिसत असल्यास ते धोकादायक असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. फंक्शनल मेडिसिन प्रॅक्टिशनर डॉ. शर्ली कोह यांच्या मते, लघवीत बुडबुडे असल्यास ती रोखण्याचा प्रयत्न करू नका; शक्य तितक्या लवकर पास करा. तथापि, जर तुम्हाला लघवीमध्ये सतत बुडबुडे दिसले, तर ते लघवीमध्ये प्रथिने असल्याची खूण आहे आणि त्यासाठी पुढील वैद्यकीय तपासणी आवश्यक असल्याचे संकेत देते.

यूरोलॉजिस्ट डॉ. आशुतोष बघेल यांनी म्हटले आहे की, लघवीत अधूनमधून बुडबुडे तयार होतात तेव्हा ते सामान्य मानले जाऊ शकतात; परंतु जेव्हा हे बुडबुडे वारंवार किंवा सतत असतात, तेव्हा ते विविध अंतर्निहित आरोग्य परिस्थितींचे सूचक असू शकतात. सामान्यपणे, प्रोटिन्युरिया किंवा मूत्रपिंडाच्या समस्यांमुळे लघवीमध्ये जास्त प्रथिने गळती झाल्यास बुडबुडे दिसून येतात. निर्जलीकरणामुळेही असे होऊ शकते. काही दुर्मीळ प्रकरणांमध्ये, गुदद्वारसंबंधीचा फिस्टुला किंवा मूत्रमार्गाचा संसर्ग यासारखी परिस्थितीदेखील उद्भवू शकते. सूज, थकवा किंवा लघवीच्या रंगात बदल यासारख्या लक्षणांसह लघवीमध्ये बुडबुडे वारंवार दिसल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे डॉ. बघेल यांनी म्हटले आहे. यावर उपचार करताना पुरेसे पाणी पिऊन हायड्रेटेड राहणे, मिठाचे सेवन मर्यादित करणे आणि निरोगी आहार यांसारखे उपाय करू शकतो, असे शेवटी डॉ. बघेल म्हणाले.

ठेवींवर आकर्षक व्याजदर
सर्वसाधारण / संस्था ठेवीवर 7.60%
ज्येष्ठ नागरिक 8.00%
मुदत : १३ महिने
दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
Toll Free No.: 1800 233 0234

डॉ. मानसी Tanvi HERBALS
डॉ. मानसी
डॉ. पुष्कराज
फ्री चेकअप कॅम्प
तन्वी तेज शिरोधारा
• शांत मन • ओव्हर थिंकिंग
• शांत झोप • हार्मोनल चेंजेस
आजच डॉ. मानसी / डॉ. पुष्कराज यांचा सल्ला घ्या.
नाडीपरीक्षण मोफत करून घ्या
9833683021 अपॉइंटमेंट आवश्यक

सीमेवरील नदी ओलांडून भारतात प्रवेश

आरोपीकडे कोलकातातील व्यक्तीच्या नावाने सीमकार्ड


सैफ हल्ला प्रकरण

लोकसत्ता खास प्रतिनिधी

मुंबई : अभिनेता सैफ अली खानवर हल्ला केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेला आरोपी मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजाद उर्फ विजय दास (३०) याने भारत-बांगलादेश सीमेवरील नदी ओलांडून घुसखोरी केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. सात महिन्यांपूर्वी भारतात प्रवेश केल्यानंतर आरोपीने कोलकातातील व्यक्तीच्या नावावर सीमकार्ड खरेदी केल्याचे चौकशीत उघड झाले आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

ठाण्यातून अटक करण्यात आलेला आरोपी शरिफुल ऊर्फ दास हा बांगलादेशात बारावीपर्यंत शिकला आहे. सात महिन्यांपूर्वी भारतात घुसखोरी करताना त्याने कोणाचीही मदत घेतली नाही. तो स्वत: तेथील डाकनी नदीतून २०० मीटर पोहून भारतात दाखल झाला. भारतात आल्यावर विजय दास नाव सांगू लागला. कोलकात्यामध्ये तो काही काळ वास्तव्याला होता. त्यावेळी त्याने कोलकात्यातील एका व्यक्तीच्या नावाने मोबाइल सीमकार्ड खरेदी केले. ते सीमकार्ड खुकूमोनी जहांगीर सेख नावावर आहे. त्याच्या सीमकार्डचा वापर करून आरोपीने सीमकार्ड खरेदी केले, अशी माहिती सूत्रांनी दिली. पोलीस या माहितीची पडताळणी करत आहेत. कोलकात्यावरून तो नोकरीसाठी मुंबईत आला. त्यावेळी कंत्राटदार अमित पांडे यांच्या माध्यमातून वरळी व ठाण्यातील हॉटेलमध्ये त्याला नोकरी मिळाली होती.

चोरीच्या उद्देशाने आरोपी सैफच्या मुलगा जहांगीरच्या खोलीत शिरला. त्या खोलीत दोन महिला कर्मचारी झोपल्या होत्या. यातील एका महिला कर्मचाऱ्याला त्याने आधी शांत राहण्यास सांगून धमकावले. तसेच १ कोटी रुपये मागितले. त्यावेळी लिमा या सैफच्या लहान मुलाला उचलण्यासाठी गेल्या असता आरोपीने त्यांच्यावर हल्ला केला. त्यावेळी सैफ अली खान व करीना दोघेही तेथे पोहोचले. त्यावेळी हल्लेखोराने हेक्सा ब्लेडसारख्या चाकूने सैफवर हल्ला केला. तैमुरची आया गीता यादेखील मधे पडल्याने जखमी झाल्या होत्या.

बांगलादेशातील कुटुंबीयांशी संपर्क

आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर चौकशीत त्याला कोलकात्याबाबत विचारले असता त्याला उत्तर देता आले नाही. त्यावेळी त्याला विचारले असता त्याने आपण बांगलादेशी नागरिक असल्याचे मान्य केले. त्याच्या मोबाइलमध्ये काही ॲप्लिकेशन सापडली आहेत. त्याद्वारे आरोपी बांगलादेशातील कुटुंबीयांशी संपर्क साधायचा. त्यावरून पोलिसांनी त्याच्या भावाशी संपर्क साधून त्याच्या जन्माचा दाखला मागवून घेतला. त्यावरून तो बांगलादेशी नागरिक असल्याचे स्पष्ट झाले, असे सूत्रांनी सांगितले.

'व्हीआयपीं'च्या कार्यक्रमांवरील उधळपट्टीला लगाम

खर्चासह कार्यक्रमांवरील सर्व नियंत्रण जिल्हाधिकाऱ्यांकडे

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : राज्यामध्ये विविध ठिकाणी होणाऱ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी (व्हीआयपी) कार्यक्रमांवर विविध विभागाकडून होणाऱ्या उधळपट्टीला लगाम लावतांना यापुढे ज्या विभागाचा कार्यक्रम, त्यांचाच खर्च तसेच या कार्यक्रमांवर सर्व नियंत्रण जिल्हाधिकाऱ्यांचे ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. एवढेच नव्हे तर अशा कार्यक्रमांसाठी खर्च मर्यादाही निश्चित करण्यात आली आहे. या निर्णयामुळे अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या कार्यक्रमांच्या नावाने होणाऱ्या उधळपट्टीला लगाम बसू शकेल.

सरकारच्या योजना लोकाभिमुख करण्यासाठी पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री अशा अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे कार्यक्रम वारंवार होत असतात. अनेकवेळा कार्यक्रमाचे आयोजन करणारा विभाग कोणता आहे, कार्यक्रमासाठी आवश्यक तो निधी कोणत्या विभागाकडून प्राप्त होणार आहे याची खातरजमा न करता फक्त एकाच विभागास सर्व जबाबदाऱ्या दिल्या जातात.

याचप्रमाणे एकाच स्वरूपाचा कार्यक्रम वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित करताना खर्चात मोठी तफावत आढळते. त्यामुळे अशा कार्यक्रमांचे आयोजनाबाबतच्या विशेष मार्गदर्शक सूचना (एसओपी) सरकारने लागू केल्या आहेत. मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी याबाबतचा आदेश निर्गमित केला असून त्यात असे कार्यक्रम कशाप्रकारे आयोजित करावेत आणि त्यावर कसा खर्च करावा, अनावश्यक खर्च टाळण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

खर्च मर्यादा निश्चित

अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठीच्या कार्यक्रमाच्या आयोजनाचे सर्वाधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले असून त्यांच्या मान्यतेनेच सर्वांची मुभा देण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, पालिका, गृह विभाग, वन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभागांवर त्यांनी कोणती कामे करावीत याची जबाबदारी देण्यात आली असून ज्या विभागाचा कार्यक्रम असेल त्यांचीच सर्व निधी उपलब्ध करून द्यावा, असे आदेशात म्हटले आहे. ५० हजार व्यक्तींच्या कार्यक्रमांसाठी सुमारे पाच कोटी, एक लाख लोकांच्या उपस्थित होणाऱ्या कार्यक्रमासाठी ९ कोटी, तर ३ लाख लोकांच्या कार्यक्रमांसाठी सुमारे २५ कोटींचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे.

'आरबीआय'कडून नरिमन पॉइंट येथील जागेचा विकास

भूखंड देण्याचा ठराव 'एमएमआरसी'कडून मंजूर

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचा (एमएमआरसी) नरीमन पॉइंट येथील ४.२ एकर भूखंडाचा विकास आता आरबीआयकडून (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया) केला जाणार आहे. हा भूखंड आरबीआयला देण्याचा ठराव एमएमआरसीच्या संचालक मंडळाने मंजूर केला आहे. या भूखंड विकासासाठी आरबीआयकडून एमएमआरसीला योग्य तो आर्थिक मोबदला दिला जाणार आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ भुयारी मेट्रो ३ मार्गिकेअंतर्गत एमएमआरसीला मार्गिकेदरम्यान काही ठिकाणचे भूखंड विकासासाठी देण्यात आले आहेत. प्रकल्पाचा खर्च वसूल करण्यासाठी हे भूखंड राज्य सरकारकडून एमएमआरसीला विकासासाठी देण्यात आले आहेत. त्यानुसार नरिमन पॉइंट येथील ४.२ एकरच्या भूखंडाचा व्यावसायिकदृष्ट्या विकास करून तो ९० वर्षांचा भाडेतत्वावर दिला जाणार होता. त्यासाठी ऑक्टोबरमध्ये एमएमआरसीने स्वारस्य निविदा मागविल्या होत्या. ही निविदा प्रक्रिया सुरू असतानाच दोन दिवसांपूर्वीच निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आल्याचे जाहीर केले. प्रशासकीय कारणाने ही निविदा रद्द करण्यात आल्याचेही या जाहिरातीत नमूद करण्यात आले होते. मात्र, नेमके कारण काय याबाबत एमएमआरसीकडून कोणतेही उत्तर देण्यात आले नाही. पाच हजार कोटींचा महसूल मिळवून देणारी निविदा अचानक का रद्द करण्यात आली असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला होता. पण, आता मात्र याबाबतचे कारण एमएमआरसीने स्पष्ट केले आहे.

एमएमआरसीने दिलेल्या माहितीनुसार आरबीआयने हा भूखंड विकसित करण्यासाठी स्वारस्य दाखविले आहे. त्यासाठी एमएमआरसीला योग्य तो मोबदला देण्यात येईल असेही स्पष्ट केले. त्यानुसार एमएमआरसीने हा भूखंड विकासासाठी आरबीआयला देण्याचा निर्णय घेतला आहे. यासंबंधीचा ठरावही एमएमआरसीच्या संचालक मंडळाकडून मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे आता हा भूखंड आरबीआय विकसित करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पश्चिम रेल्वेवरील १२७ लोकल फेऱ्या रद्द

माहीम-वांद्रे दरम्यान ब्लॉक; वेळापत्रकात बदल

लोकसत्ता प्रतिनिधी



मुंबई : पश्चिम रेल्वेवरील माहीम आणि वांद्रे दरम्यानच्या पुलाच्या पुनर्बांधणीच्या कामासाठी शुक्रवारी रात्रकालीन ब्लॉक घेतला जाईल. यामुळे पश्चिम रेल्वेच्या वेळापत्रकात बदल केला आहे. या कामामुळे अनेक लोकल सेवेच्या वेळेवर परिणाम होणार आहे. तसेच शुक्रवार-शनिवारी सुमारे १२७ लोकल रद्द राहतील आणि ६० लोकल अंशत: रद्द केल्या जातील.

माहीम आणि वांद्रे स्थानकांदरम्यान पुलाच्या पुनर्बांधणीसाठी शुक्रवारी रात्री ११ ते शनिवारी सकाळी ८.३० पर्यंत अप आणि डाऊन धीम्या मार्गावर, रात्री १२.३० ते सकाळी ६.३० पर्यंत डाऊन जलद मार्गावर ब्लॉक असेल. शुक्रवारी ११.५८ वाजता चर्चगेट-विरार धीमी लोकल शेवटची लोकल असेल. रात्री ११ पासून चर्चगेटवरून सुटणाऱ्या सर्व धीम्या लोकल मुंबई सेंट्रल ते सांताक्रूझ दरम्यान जलद मार्गावर धावतील. या लोकल महालक्ष्मी, लोअर परळ, प्रभादेवी, माटुंगा रोड, माहीम आणि खार रोड स्थानकांवर थांबणार नाहीत.



मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड
३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाही व नऊमाहीसाठी अलेखापरीक्षित आर्थिक परिणामांचे सार
(₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३१ डिसेंबर, २०२४ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर, २०२४ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ डिसेंबर, २०२३ अलेखापरीक्षित	संपलेली नऊमाही ३१ डिसेंबर, २०२४ अलेखापरीक्षित	संपलेली नऊमाही ३१ डिसेंबर, २०२३ अलेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२४ लेखापरीक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न	६,०९७	६,३५९	४,४८९	१७,८७०	१२,३५६	१६,७३६
२. कालावधीसाठीचा निव्वळ नफा (कर, अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींपूर्वी)	३,७५९	४,२७२	२,२१४	११,०५५	८५४	३,२८२
३. कालावधीसाठीचा करपूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	३,७५९	४,२७२	२,२१४	११,०५५	८५४	३,२८२
४. कालावधीसाठीचा करनंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	३,०३९	४,२७२	२,२१४	११,०३५	८५४	३,२९१
५. कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीसाठीचा सर्वसमावेशक नफा (करनंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करनंतर)]	३,७०९	४,२८५	२,२९६	११,००७	८३७	३,२४३
६. समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर)	२३,९१८.५०	२३,९१८.५०	२३,९१८.५०	२३,९१८.५०	२३,९१८.५०	२३,९१८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन रिझर्व वगळून मागील वर्षांच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्याप्रमाणे)	-	-	-	-	-	(१६,८६८)
८. प्रत्येक समभागचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी)* मूलभूत आणि सौम्यीकृत (₹)	१.५६	१.७८	०.९६	४.६०	०.३६	१.३६

* अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न सौम्यीकृत नाही.

नोंद:
१. वरील तक्ता सेबीसिक विनियम निष्कर्षांचे सार आहे. सेबीसिक विनियम निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.
२. वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षण समितीकडून दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी केले गेले आहे आणि दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

पंचनामे निरीक्षण निष्कर्ष माहितीसाठी अनुक्रमे भांडवल बाजार

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडसाठी
स्वाक्षरी/-
नवीन कुमार अग्रवाल
व्यवस्थापकीय संचालक व पूर्णवेळ कार्यकारी अधिकारी

स्थळ: मुंबई
दिनांक: २० जानेवारी २०२५

पोलिओ हद्दपार; आता 'फॅटी लिव्हर'ला करू!

अमिताभ बच्चन यांचा विश्वास

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : पोलिओ निर्मूलनासाठी राबविलेल्या मोहिमेमुळे अवघ्या आठ वर्षांत देश पोलिओमुक्त करण्यात यश आले. त्यामुळे आता फॅटी लिव्हरचेही आपण निर्मूलन करू, असा विश्वास अभिनेते अमिताभ बच्चन यांनी व्यक्त केला. शतक महोत्सवी वर्षानिमित्त केईएम रुग्णालयाच्या सुरू करण्यात आलेल्या फॅटी लिव्हर केंद्राचे अमिताभ बच्चन सदिच्छादूत असून, त्यांच्या हस्ते सोमवारी या केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

मला २००५ मध्ये यकृताचा आजार झाला. यावेळी मी पोटविकार तज्ज्ञ डॉ जयंत बर्वे यांना सांगितले. मला लिव्हर सिरॉयसिस झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. डॉक्टरांनी वेळीच केलेल्या निदानामुळे आणि यावर उपचार उपलब्ध असल्याने मी या आजारातून सुखरूप बाहेर पडू शकलो. फॅटी लिव्हर या आजाराचे पूर्णत: निर्मूलन करण्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करेन, असा विश्वासस त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला महापालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त महापालिका आयुक्त विपीन शर्मा, अधिष्ठाता डॉ संगीता रावत, पोटविकार तज्ज्ञ डॉ जयंत बर्वे, डॉ आकाश शुक्ला यावेळी उपस्थित होते.

वैद्यकीय विद्यार्थ्यांचे कौतुक

केईएम रुग्णालयाला ९०० वर्ष होत आहे ही बाब कौतुकास्पद आहे. गेल्या काही वर्षांत आरोग्य क्षेत्रात मोठे बदल झाले असल्याचे त्यांनी सांगितले. 'आप हे तो हमारा भविष्य स्वस्थ है' असे सांगत त्यांनी वैद्यकीय विद्यार्थी उद्याचे भविष्य असल्याचे सांगत त्यांनी कौतुक केले. करोनामध्ये सर्वजण घरात बसले होते. त्यावेळी डॉक्टरांनी रस्त्यावर उतरून रुग्णांची सेवा केली होती. डॉक्टरांनी केलेल्या उपचाराची त्यांनी आठवण काढली.

भिवंडीत भररस्त्यात चाकूहल्ला

ठाणे : भिवंडी येथील भोईवाडा भागात भररस्त्यात पोटात चाकूने भोसकून एकाच्या हत्येचा प्रयत्न झाला. हल्ला केल्यानंतर हल्लेखोरांनी जखमी अवस्थेतील तरुणाला शिवीगाळ आणि धमकावित असल्याचे चित्रीकरण मोबाईलमध्ये कैद झाले आहे. जखमी व्यक्तीच्या पोटातील आतडे बाहेर आले होते. पोलिसांनी याप्रकरणी मोहम्मद नसीम कादीर शेख (२५) याला अटक केली.

पंचतारांकित हॉटेलमध्ये महिलेचा मृतदेह

मुंबई : मरीन ड्राईव्हच्या पंचतारांकित हॉटेलमध्ये ६० वर्षीय महिलेचा मृतदेह असून विनती मेहतानी असे मृत महिलेचे नाव आहे. हॉटेलच्या २७ व्या माळ्यावरील खोलीत ही महिला राहात होती. याप्रकरणी मरीन ड्राईव्ह पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली आहे. हॉटेलच्या कर्मचाऱ्याने खोलीची बेल वाजवल्यानंतरही महिलेने दार उघडले नाही. त्यानंतर मास्टर चावीने खोलीचा दरवाजा उघडला असता महिलेचा मृतदेह सापडला. रविवारी ही घटना घडल्याचे पोलिसांनी सांगितले.

इगतपुरीतील अपघातात कल्याणचे तीन जण ठार

नाशिक : इगतपुरी तालुक्यात घोटी-सिन्नर राज्य महामार्गावर सोमवारी सायंकाळी रिक्षा आणि कंटेनरची समोरासमोर धडक होऊन तीन जणांचा मृत्यू, तर दोन जण जखमी झाले. मृत आणि जखमी सर्व कल्याण येथील रहिवासी आहेत.

एसएमबीटी रुग्णालयजवळ हा अपघात झाला. सायंकाळी घोटी-सिन्नर रस्त्यावर रिक्षा समोरून येणाऱ्या कंटेनरला धडकली. या अपघातात रिक्षाचालक अमोल विनायक घुगे (२५, नांदवली, कल्याण) यांचा जागीच मृत्यू झाला. तर त्यांची मुलगी स्वरा घुगे (४), मार्तंड आव्हाड (६०) यांचा रुग्णालयात मृत्यू झाला. रिक्षाचालक घुगे यांची पत्नी प्रतीक्षा घुगे (२२), कलावती आव्हाड (५८, कल्याण) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



